# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001

YEAR : 30 ) 15th Octomber 2005 ( No : 08

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## सिनेट निवडणुक : २००५

# टीचर्स व ग्रॅज्युएट पॅनेलचा
# जाहीरनामा

*

-लेखन-

**प्रा.बी.टी.देशमुख**
विधानपरिषद सदस्य,
अध्यक्ष 'नुटा'

**सिनेटमध्ये "नुटा" ने दिलेल्या सूचनांचे पालन करण्यास वचनबद्ध असलेल्या शिक्षक व पदवीधर उमेदवारांचे पॅनेल**

# *शिक्षक व पदवीधर मतदारांना विनंती*

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ सिनेटची निवडणुक रविवार, दिनांक २३ ऑक्टोबर २००७ रोजी होऊ घातली आहे. सिनेटमध्ये शिक्षकांच्या व पदवीधरांच्या प्रश्नांवर नुटाने दिलेल्या सूचनांचे पालन करण्यास वचनबद्ध असलेल्या शिक्षक व पदवीधर उमेदवारांचे पॅनेल निवडणुकीसाठी उभे करण्यात आलेले आहे.

शिक्षक व पदवीधर मतदार संघातून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या सिनेटवर निवडून द्यावयाच्या या जागांसाठी होणाऱ्या मतदानामध्ये या बुलेटीनमध्ये नमूद केलेल्या उमेदवारांना, सूचित केल्याप्रमाणे पसंतीचे क्रमांक देऊन निवडून द्यावे अशी सर्व शिक्षक व पदवीधर मतदारांना विनंती आहे.

**आपले नम्र**
**प्रा.बी.टी.देशमुख**, अध्यक्ष "नुटा"

| | | |
|---|---|---|
| **डॉ.ए.जी.सोमवंशी** | **डॉ.एस.ए.तिवारी** | **डॉ. प्रविण रघुवंशी** |
| उपाध्यक्ष | कोषाध्यक्ष | सहसचिव |

# मतदानाची पद्धती कशी आहे?

### (A) पदवीधरांसाठी

१. पदवीधरांसाठी प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या एकल संक्राम्य मतदान पद्धतीनुसार जवळ जवळ १० हजार पदवीधर मतदार १० प्रतिनिधी निवडणार आहेत.

२. यापैकी पाच जागा राखीव आहेत. अनुसूचित जातीतून (S.C.) एक, अनुसूचित जमातीतून (S.T.) एक, विमुक्त जाती/जमातीतून (VJNT) एक, इतर मागासवर्गीय जातीतून (O.B.C.) एक व महीलातून एक असे हे जागावाटप आहे. त्यामुळे प्रत्येक पदवीधर मतदारास खुल्या जागांसाठी एक, अनुसूचित जातीसाठी एक, अनुसूचित जमातीसाठी एक, विमुक्त जाती/ जमातीकरिता एक, महिलांकरिता एक व इतर मागासवर्गीय जातीकरिता एक **अशा एकूण ६ मतदान पत्रिका मिळतील.**

### (B) शिक्षकांसाठी :

३. प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या एकल संक्राम्य मतदान पद्धतीनुसार जवळ जवळ ३००० प्राध्यापक १० फॅकल्टीज् मधून २० प्रतिनिधी निवडणार आहेत. मतदान बिनचूकपणे होण्यास या मतदान पद्धतीविषयी देण्यात आलेली पुढील माहिती आपल्याला उपयुक्त ठरेल.

४. प्रत्येक शिक्षक मतदाराला पुढील प्रमाणे एकूण बारा मतपत्रिका मिळतील. कला विद्याशाखा दोन मतपत्रिका, विज्ञान विद्याशाखा दोन मतपत्रिका, शिक्षण विद्याशाखा दोन मतपत्रिका, अभियांत्रिकी व तांत्रिकी विद्याशाखा एक मतपत्रिका, वाणिज्य विद्याशाखा एक मतपत्रिका, समाज विज्ञान विद्याशाखा दोन मतपत्रिका, वैद्यक विद्याशाखा एक मतपत्रिका व गृहविज्ञान विद्याशाखा एक मतपत्रिका अशा एकूण बारा मतपत्रिका मिळतील.

५. प्रत्येक मतपत्रिकेवर त्या फॅकल्टीतून उभे असलेल्या सर्व उमेदवारांची नावे राहतील व त्या उमेदवारांच्या नावासमोर आपण पसंतीचे १, २, ३, ४ असे क्रमांक आकड्यात लिहावयाचे आहेत. जितक्या उमेदवारांच्या नावांसमोर क्रमांक लिहिण्याची आपली इच्छा असेल तेवढ्यांच्या नावासमोर आपण क्रमांक लिहू शकता.

६. उदा. शिक्षक मतदार संघातील एका मतदाराला आर्टस फॅकल्टीची मतपत्रिका मिळेल. त्या मतपत्रिकेवर जर एकूण ४ उमेदवारांची नावे आहेत तर त्यामध्ये समजा पॅनेलचे ३ उमेदवार आहेत. त्यांना आपण आपल्या पसंतीप्रमाणे १, २, ३ पसंतीचे क्रमांक द्या. मग त्याच मतदाराला 'सोशल सायंसेस' ची मतपत्रिका मिळेल. त्या मतपत्रिकेवर 'पॅनेल' चे जर पाच उमेदवार आहेत तर तेथे आपण १, २, ३, ४, ५ असे त्या पाचांच्या नावासमोर आपल्या पसंतीचे क्रमांक लिहा.

### (C) सर्वसामान्य सूचना

७. प्रत्येक मतपत्रिकेमध्ये 'पॅनेल' चे जेवढे उमेदवार आहेत त्या सर्व उमेदवारांना आपण पसंतीचे क्रमांक द्यावे, अशी आमची आपणास विनंती आहे. **"मतदान करण्याबाबत आमची विनंती"** मध्ये नमूद केल्याप्रमाणे पसंतीक्रम द्यावे.

८. पसंतीचे क्रमांक मतपत्रिकेवर उमेदवाराच्या नावासमोर नेमून दिलेल्या जागी लिहावयाचे असून ते मराठी, हिंदी, इंग्रजी वा रोमन अंकात लिहावे. अक्षरी मुळीसुद्धा लिहू नये. 'प्रथम', 'व्दितीय' असे लिहू नये. First, Second असे लिहू नये. 1st, 2nd असे सुद्धा लिहू नये. पसंतीचा क्रमांक नोंदतांना तो अंकातच १, २, ३, ४ असा नोंदवावा. आकड्यांना कंसही करू नये.

९. ज्या मतपत्रिकेवर पसंतीचा प्रथम १ क्रमांक अंकात कुणालाच दिला नसेल ती मतपत्रिका रद्द होते हे कृपया लक्षात ठेवा.

१०. पुढील प्रकारच्या मतपत्रिका ह्या वाया जातात हे लक्षात ठेवावे.

(A) If One preference is given to more than one candidate

(B) If Two preferences are given to one candidate.

(C) If Consecutive preferences are not given.

११. मतपत्रिकेवर मतदाराने स्वाक्षरी केली असेल किंवा मत कोणी दिले आहे हे कळू शकेल अशा खाणा-खुणा किंवा खोड-तोड ज्या मतपत्रिकेवर असेल ती मतपत्रिका रद्द होऊ शकते.

१२. मतदान पत्रिकेवर मतदान करताना काही चूक किंवा खोडतोड झाल्यास मतपत्रिका तशीच मतपेटीत टाकू नये. ती मतपत्रिका मतदान अधिकाऱ्याकडून रद्द (Cancel) करून घेऊन दुसरी मतपत्रिका प्राप्त करून घ्यावी.

### आमची विनंती

विद्यापीठाच्या पुढच्या पाच वर्षांच्या कारभाराचे भवितव्य आपल्या या मतदानावर ठरणार आहे, तेव्हा आपण घाईगर्दी न करता मतदान करावे. पॅनेलच्या छापील यादीचा कागद आपणाला पुरविला आहे. पसंतीक्रम ठरविण्यास त्यामुळे आपणास मदत होईल. एक एका फॅकल्टीची मतपत्रिका मिळाली की त्या फॅकल्टीतून पॅनेलचे जेवढे उमेदवार आहेत त्यांच्या नावासमोर पसंतीचे क्रमांक आपण टाकावे. (अंकामध्ये, अक्षरात नव्हे)

त्या त्या फॅकल्टीतून पॅनेलचे जेवढे उमेदवार आहेत त्या सर्वांनाच पसंतीचे क्रमांक द्यावेत अशी आपणास विनंती आहे. पॅनेलमध्ये नसलेल्या कोणत्याही उमेदवाराचा प्रचार (पसंतीच्या कोणत्याही क्रमांकासाठी) पॅनेलचे उमेदवार करणार नाहीत, असे त्यांनी अभिवचित केले आहे.

शिक्षक व पदवीधर मतदार संघामध्ये कोणत्या फॅकल्टीतून पॅनेलचे कोण कोण उमेदवार आहेत याची यादी व मतदारांनी तेथे कशाप्रकारे मतदान करावे या बाबतची आमची विनंती याच अंकात स्वतंत्रपणे नमूद केली आहे.

*****

## उमेदवारांनी मान्य केलेली निश्चित भूमिका

सिनेटमध्ये शिक्षकांच्या व पदवीधरांच्या प्रश्नावर नुटाने दिलेल्या सूचनांचे पालन करण्यास वचनबद्ध असलेल्या शिक्षक व पदवीधर उमेदवारांचे हे पॅनेल असेल. पॅनेलमध्ये असलेल्या प्रत्येक उमेदवाराने काही बंधनांचे पालन करावयाचे लेखी स्वरुपात मान्य केलेले आहे. ती बंधने पुढीलप्रमाणे :-

१) प्रत्येक उमेदवार स्वतःसाठी पसंतीच्या प्रथम क्रमांकाचे मत मागण्यास व्यक्तिशः मोकळा असेल.

२) स्वतःच्या वैयक्तिक प्रचाराबरोबर पॅनेलमधील सर्व उमेदवारांना पसंतीचे क्रमांक अवश्य द्या अशा प्रकारचा प्रचार करण्याची प्रत्येकावर जबाबदारी असेल.

३) पॅनेलमध्ये नसलेल्या कोणत्याही उमेदवाराचा प्रचार पॅनेलमधील उमेदवार करणार नाही.

४) पॅनेलवर असलेल्या कोणत्याही उमेदवाराला आपण पसंतीचा पहिला किंवा वरचा क्रमांक देणार आहोत असे मतदाराने सांगितल्यास पॅनेलवरील उमेदवार त्याला दुसरा किंवा पसंतीचा पुढील क्रमांक मागतील.

५) पॅनेलवरील अमुक एका उमेदवाराला फारच कमी मते पडतात, तो पडतोच तेव्हा त्याला पसंतीचा प्रथम क्रमांक न देता तो मला द्या असा प्रचार कोणीही उमेदवार करणार नाही.

६) पॅनेलवरील अमुक एका उमेदवाराला जास्त मते मिळतात, तो तर येतोच तेव्हा त्याला पसंतीचा प्रथम क्रमांक न देता तो मला द्या असा प्रचार कोणीही उमेदवार करणार नाही.

उपरोक्त सूचनांचा अव्हेर करून जर पॅनेलवरील एखादा उमेदवार प्रचार करीत असेल तर त्या उमेदवाराला मतदारांनी ताबडतोब हटकले पाहिजे अशी विनंती आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ सिनेट निवडणुक : २००५

# टीचर्स व ग्रॅज्युएट पॅनेलचा जाहीरनामा

**प्रा.बी.टी.देशमुख,** विधानपरिषद सदस्य. अध्यक्ष 'नुटा'

## सिनेटच्या निवडणुकांचे महत्त्व

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ सिनेटच्या निवडणुका रविवार, दिनांक २३ ऑक्टोबर २००५ रोजी होऊ घातल्या आहेत. आमच्या सहकारी मित्रांना येत्या सिनेट निवडणुकांमध्ये सर्व शिक्षक व पदवीधर मतदारांनी निवडून द्यावे अशी विनंती करण्यासाठी हा जाहीरनामा प्रसिद्ध केला असून सदरहू निवडणुकांशी संबंधित प्रश्नांची चर्चा पुढील लहान लहान परिच्छेदातून केलेली आहे.

२. अमरावती विद्यापीठाची स्थापना १ मे १९८३ रोजी झाली. आता या गोष्टीला २२ वर्षे पूर्ण झालेली आहेत. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम २५ मध्ये सिनेटची रचना दिली असून कलम २६ मध्ये सिनेटचे अधिकार व कर्तव्ये नमूद केलेली आहेत.

## सिनेटचे अधिकार

३. **अस्तित्वात असलेला स्टॅट्युट रद्द करणे किंवा त्यामध्ये बदल करणे तसेच नवीन स्टॅट्युट तयार करणे हा सिनेटचा अधिकार आहे.** १९९४ च्या महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याच्या ५ व्या प्रकरणामध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे संलग्न महाविद्यालयातील **शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या व्यावसायिक जीवनाशी संबंधित कितीतरी महत्त्वपूर्ण बाबींसाठी सिनेटने प्रस्तावित केलेल्या अथवा व्यवस्थापन परिषदेने तयार केलेल्या परिनियमांना अंतिम स्वरूपात मान्यता देण्याचा अधिकार सिनेटचा आहे.** हे चटकन लक्षात यावे म्हणून महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याच्या ५१ व्या कलमातील संबंधित परिच्छेद जसाचा तसा पुढे देत आहोत :-

"51. Subject to the provisions of this Act, the statutes may provide for all or any of the following matters namely :-

(8) **Qualifications, recruitment,** workload, code of conduct, terms of office, duties and conditions of service, including periodic assessment of teachers, officers and other employees of the university and the affiliated colleges (except those colleges or institutions maintained by the State or Central Government or a local authority) the provision of pension, gratuity and provident fund, the manner of termination of their services, as approved by the State Government ;

(11) the norms for grant of autonomy to university departments or institutions, affiliated colleges and recognised institutions, subject to the approval of the State Government;

(13) Provision of reservation of adequate number of posts of teachers, officers and other employees of the university, affiliated colleges and recognised institutions for members of the Scheduled Castes and Scheduled Tribes and other Backward Classes in accordance with the policy of the State Government;

(14) number of working days, number of actual days of instructions, holidays other than Sundays, vacation and terms in academic year;

(15) disciplinary action against defaulting teachers, officers and other employees of the university, affiliated colleges and recognised institutions other than the colleges or institutions managed and maintained by the State Government or Central Government or Local Authorities;"

## १९७६ पूर्वीचा कालखंड

४. १९७६ पूर्वीच्या पाच दहा वर्षांचा विद्यापीठाच्या कामाचा अनुभव पाहिला तर विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांनी शिक्षकांची मोठ्या प्रमाणावर गळचेपी व ससेहोलपट केलेली आपणांस दिसून येईल. याची कारणमीमांसा करताना असे लक्षात येईल की त्या काळामध्ये सिनेटवर शिक्षकांव्यतिरिक्त इतर वर्गांना मोठ्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात आलेले होते. त्यामानाने शिक्षकांना त्यावेळच्या सिनेटवर अतिशय अल्प जागा देण्यात आल्या होत्या. त्यांचे मतदानसुद्धा विद्याशाखानिहाय होते. सर्व शिक्षकांच्या सुखदुःखाबद्दल जागरूक व तत्पर प्रतिनिधित्व त्यामुळे शिक्षकांच्या वाट्याला येत नव्हते आणि त्यामुळेच १९७६ पूर्वीच्या कालखंडात संघटित शिक्षक प्रतिनिधित्वाच्या अभावी अनेक शिक्षकविरोधी निर्णय विद्यापीठातून बाहेर पडत असत. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठात असलेल्या सेवाशर्तीशी तुलना करू जाता, 'सेकंडरी स्कूल कोडशी' तुलना करू जाता, **हीन दर्जाचे 'कॉलेज कोड' नागपूर विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाने ७२-७३ च्या दरम्यान मंजूर केले होते व ते त्यावेळच्या कोर्टाच्या (सिनेटच्या) मंजुरीसाठी मांडण्यात आले होते.** या कॉलेज कोडमध्ये असलेल्या घाणेरड्या तरतुदींचा इतका बभ्रा झाला की परिणामी १५०० प्राध्यापकांचा एक मोर्चा दि. २० एप्रिल १९७३ रोजी विद्यापीठावर गेला व ते कॉलेज कोड कार्यकारी मंडळाला मागे घ्यावे लागले. डझनावारी शिक्षकांच्या नेमणुका वर्षानुवर्षे केवळ सत्रकालावधीसाठी केल्या जात असत व सत्रान्ती त्यांची सेवामुक्ती केली जात असे. पण याबाबतीत कोणतीही दखल विद्यापीठ घेत नसे. जणू काही व्यवस्थापकांचा तो जन्मसिद्ध हक्कच आहे असे विद्यापीठाने त्या काळात मान्य करून टाकले होते. **"क्लीअर व्हेकन्सी" ची व्याख्या करण्याचे विद्यापीठाने त्यावेळी सतत टाळले व त्यामुळे प्रोबेशनवर नेमणूक दिलीच पाहिजे अशा प्रकारचे बंधन घालण्याची विद्यापीठाला त्याकाळात अजिबात गरज वाटत नसे.** स्वाभाविकपणे दोन वर्षानंतर कन्फर्म केले पाहिजे असा आग्रह विद्यापीठ धरत नसे. परिणामी स्पष्ट रिक्त पदावरसुद्धा तात्पुरत्या नेमणुका करण्याची फॅशन नागपूर विद्यापीठ क्षेत्रामध्ये वहिवाटीच्या आधारावर रूढ झाली होती व कितीही वर्षाची टेम्पररी सर्व्हिस असलेल्या व्यक्तीला एक महिन्याची नोटीस देऊन काढून टाकता येते हे विद्यापीठानेच अप्रत्यक्षपणे मान्य केले असल्यामुळे त्यात काही दोष आहे असे व्यवस्थापकांना वाटण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता.

## १९७६ नंतरचा कालखंड

५. सातत्याने शिक्षकांवर होणारा हा जो अन्याय आहे त्याच्या विरोधात संघटितपणे उभे राहिले पाहिजे असा विचार शिक्षक संघटनेमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या मनामध्ये उभा राहिला. दरम्यान १९७४ चा नागपूर विद्यापीठ कायदा अमलात आलेला होता. शिक्षकांना २५ जागा देण्यात आलेल्या होत्या आणि ह्या २५ जागा सर्व शिक्षकांनी निवडावयाच्या होत्या. त्यावेळी आम्ही २५ जागांसाठी ३२ उमेदवाराचे एक टीचर्स पॅनेल उभे केले होते. २५ जागांपैकी बहुसंख्य जागांवर टीचर्स पॅनेलचे उमेदवार निवडून आले. शिक्षकांच्या प्रश्नावर सिनेटमध्ये नुटाने दिलेल्या सूचनांचे पालन करण्यासाठी हे सर्व उमेदवार वचनबद्ध होते. संघटित स्वरुपामध्ये शिक्षकांचा आवाज सिनेटमध्ये पोचल्याचा परिणाम म्हणून कधी नव्हे ते १९७६ मध्ये प्रत्यक्ष शिक्षक संघटनेमध्ये काम करणारा एक शिक्षक विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळावर सुद्धा निवडून आला. पुढच्या तीन वर्षात १९७९ मध्ये प्रत्यक्ष संघटनेमध्ये काम करणारे असे तीन शिक्षक कार्यकारी मंडळावर निवडून आले. **शिक्षकांचे हे जे संघटित प्रतिनिधित्व विद्यापीठामध्ये पोचले त्यामुळे १९७६ नंतरच्या ६ वर्षाच्या काळात विद्यापीठाच्या प्राधिकरणांचा शिक्षकाच्या सामायिक हिताच्या विरोधात निर्णय घेण्याच्या कुवतीचा झरा पार आटून गेला हे जाहीरपणे सांगितले पाहिजे.**

६. शिक्षक विरोधाची विद्यापीठाची धार बोथट झाली इतकेच नव्हे तर प्राचार्य, व्यवस्थापक व शासकीय प्रतिनिधीच्या बरोबर कार्यकारी मंडळ व सिनेटमध्ये बसून आपली बाजू तर्कशुद्ध पद्धतीने मांडण्याची संधी शिक्षक प्रतिनिधींना मिळाली व त्यातून कितीतरी शिक्षकहिताचे निर्णय भराभर बाहेर येऊ लागले.

सेवामुक्त करण्यात आलेल्या शिक्षकांच्या तक्रारी ऐकण्यासाठी कार्यकारी मंडळाची जी तक्रार निवारण समिती होती तिचे बहुसंख्य निर्णय १९७६ च्या पूर्वी शिक्षकांच्या विरोधात गेलेले (व ते निकाल कार्यकारी मंडळाने मान्य केलेले) आपल्याला दिसून येतील. १९७६ नंतरच्या काळामध्ये मात्र बऱ्याच मोठ्या प्रमाणामध्ये या समितीकडून शिक्षकांना न्याय मिळू लागला. कायद्यामध्ये न्यायाधिकरणाची तरतूद समाविष्ट होइपर्यंत ही समिती सेवामुक्ती प्रकरणांत सुद्धा काम करीत होती. या काळात असंख्य सेवामुक्त शिक्षकांना पुनःस्थापित करण्यास या समितीचे निर्णय कारणीभूत झाले.

## अतिरिक्त शिक्षकांच्या समस्या

७. १९७६ च्या दरम्यान शिक्षक प्रतिनिधींचा विद्यापीठामध्ये संघटित प्रवेश

झाल्यानंतर लगोलग एका अतिशय महत्त्वाच्या संकटमय परिस्थितीला तोंड देण्याची पाळी शिक्षक प्रतिनिधींवर आली. १० + २ + ३ च्या आकृतीबंधामुळे शिक्षक अतिरिक्त ठरणे ही ती समस्या होय. १९७६ च्या सुरुवातीला शासनाने अतिरिक्त शिक्षक ठरविण्यासाठी विद्यापीठांचे काही प्रतिनिधी मुंबईच्या एका वर्कशॉपमध्ये ट्रेनिंग करिता बोलाविले होते. नागपूर विद्यापीठातर्फे प्राचार्य मो.म. लांजेवार व प्रा.बी.टी.देशमुख यांना पाठविण्यात आले होते. एका आठवड्याला एका विषयाला किती तास असावेत हे नागपूर विद्यापीठामध्ये १९२३ पासून १९७६ पर्यंत कधीही ठरविण्यात आले नव्हते. शिक्षक प्रतिनिधींनी याबाबतचा आग्रह धरला व त्याचे नियम तयार करून घेतले. १९७६ च्या उन्हाळाभर अमरावती येथे सर्वश्री सराफ व बी.टी.देशमुख यांच्या कमिटीने व नागपूर येथे सर्वश्री दुबे व लांजेवार यांच्या कमिटीने अतिरिक्त शिक्षक निश्चित करण्याचे कार्य पूर्ण केले. कोणाकडून तरी अशी कागाळी केल्या गेली की **नागपूर विद्यापीठामध्ये दर विषयाला दर आठवड्याला पुरेपूर तासिका ठरवून घेतल्यामुळे जादा अतिरिक्त शिक्षक विदर्भात निघाले नाहीत.**

**८. शासनाने या दोनही कमिटीचे काम कचऱ्याच्या टोपलीत टाकले व नव्याने विद्यापीठाच्या पातळीवर एक ॲडहॉक कमेटी नेमण्यात यावी असा आदेश दिला.** दर विषयाला दर आठवड्याला पूर्वी ज्या तासिका होत्या त्याच कायम ठेवाव्या व नवे नियम मान्य केले जाऊ नये असेही आदेश शासनाने दिले. ११ सभासदांची नवी ॲडहॉक कमेटी कुलगुरुंनी माननीय बाबासाहेब घारफळकर यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे नियुक्त केली. या कमेटीवर शिक्षक प्रतिनिधींना टाळणे हे अशक्य होते आणि त्यामुळे प्रा.बी.टी.देशमुख यांचे बरोबर संघटनेमध्ये काम करणाऱ्या तीन शिक्षक प्रतिनिधींची या ॲडहॉक कमेटीवर नियुक्ती करण्यात आली होती. दर विषयाला दर आठवड्याला किती तास ठेवावे याबाबतचा कोणताही नियम नव्हता म्हणून विद्यापीठाने ठरवून दिलेले हे नियम ग्राह्य मानले पाहिजे असा आम्ही आग्रह धरला व ॲडहॉक कमेटीला ते मान्य करण्याशिवाय गत्यंतर राहिले नाही. जवळ जवळ दोन तीन महिने अतिरिक्त शिक्षक निर्धारणाचे कार्य विद्यापीठामध्ये सुरु होते. शिक्षक प्रतिनिधीच्या संघटित भूमिकेमुळे आणि या समितीचे अध्यक्ष मा. श्री. बाबासाहेब घारफळकर यांच्या सहकार्यामुळे अतिरिक्त शिक्षकांवरचे एक फार मोठे संकट त्यावेळी टळले.

९. पुढच्या काळामध्ये दर आठवड्याला दर विषयाला किती तास ठेवावे याबाबत ॲडव्हॉक कमेटीचा नियम, कुलगुरुंनी एका वेगळ्या पत्रकाने प्रसिद्ध केलेला नियम व महाराष्ट्र शासनाचे नियम अशी तिहेरी व्यवस्था किती तरी दिवस अस्तित्वात राहिली. पण शिक्षक प्रतिनिधीच्या संघटित प्रभावामुळे शेवटी ॲडहॉक कमेटीच्या नियमांना मान्यता मिळाली व कुलगुरुंनीसुद्धा त्यांचे पत्रक मागे घेऊन अनेक महिने राहिलेली ही तिहेरी व्यवस्था संपुष्टात आणली गेली.

### स्पष्ट रिक्त पदाची व्याख्या व "परिनियम ५३"

**१०. नागपूर विद्यापीठामध्ये स्पष्ट रिक्त पदाची व्याख्या १९२३ ते १९७६ पर्यंत कधीही करण्यात आलेली** नव्हती. चार वर्षे जे पद अस्तित्वात असेल ते पद स्पष्ट रिक्त समजले पाहिजे. स्पष्ट रिक्त पदावर नेमणूक ही प्रोबेशनवरच करण्यात आली पाहिजे. हा दोन वर्षाचा प्रोबेशन काळ संपल्यावर कन्फर्म करण्यात आले पाहिजे व **कन्फर्म केलेल्या शिक्षकाला विद्यापीठाच्या परवानगीशिवाय सेवेतून काढता कामा नये अशा प्रकारचा "परिनियम ५३" नागपूर विद्यापीठामध्ये करण्यात आला.** अशा प्रकारचा परिनियम फक्त नागपूर व अमरावती विद्यापीठामध्येच अस्तित्वात आहे हे नमूद करणे आवश्यक आहे. सिनेटवर निवडून गेलेल्या शिक्षक प्रतिनिधींनी मिळविलेली ही महत्वपूर्ण उपलब्धी होती. **१९७६ नंतरच्या काळात शिक्षकांच्या सामायिक हिताच्या विरोधात निर्णय होणार नाहीत अशा प्रकारे विद्यापीठाच्या अधिकारक्षेत्रात असलेल्या न्याय्य तरतुदीसाठी सिनेटवरील शिक्षक प्रतिनिधींनी जागता पहारा ठेवला हे कोणीही नाकबूल करणार नाही.**

**११.** दिनांक १८.१.१९८९ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने महाराष्ट्र राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांबरोबर बोलणी केली व संप मागे घेत असताना उभयपक्षी जे ॲग्रीमेंट झाले त्या ॲग्रीमेंटच्या परिच्छेद ३ मध्ये पुढील उल्लेख होता. :-

"Until the respective Universities have framed as per the guidelines to be issued by the U.G.C., the necessary statutes relating to the procedure (including the composition of the Assessment/Selection Committee) for promotion to the Senior Scale/Selection Grade, the existing Assessment Committee (constituted to assess the performance of a teacher before he is allowed to draw the increment after the stage of Rs. 1,300/- in the existing pay scale of Rs. 700-1600) including a representative of the D.H.E. wherever not already included, be charged with the implemenation of the process of selection for promotion to the Sr. Scale as well as Selection Grade."

गेल्या १० वर्षात अनेक निर्णय या संदर्भात विद्यापीठामध्ये घ्यावे लागले. या ठिकाणी हे नमूद करताना आनंद होतो की टीचर्स पॅनेलवरील जे शिक्षक सिनेटवर व सिनेटमधून तत्कालीन कार्यकारी परिषदेवर निवडून गेले होते त्यांच्या जागरुकपणामुळे प्राध्यापकांच्या वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणीतील स्थाननिश्चितीबाबत अतिशय उत्तम निर्णय घेतले गेले व त्यामुळे या स्थाननिश्चितीचे काम इतर विद्यापीठांच्या तुलनेत आपल्या विद्यापीठात अतिशय झपाट्याने व बिनचूक होऊ शकले व याबाबत शिक्षकांना अन्याय निवारणार्थ फारशा तक्रारी करण्याचा प्रसंग आला नाही.

**१२.** विद्यापीठ अनुदान आयोगाची नवीन वेतनश्रेणी अंमलात आणण्याविषयी केंद्र शासनाने राज्य शासनाच्या शिक्षण सचिवांना लिहिलेल्या २७ जुलै १९९८ च्या पत्राच्या परिच्छेद ५ मध्ये वेतनपुनर्रचनेच्या योजनेच्या अनेक बाबींचे तपशील हे विद्यापीठांनी स्टॅट्युट करून विहित करावयाचे आहेत असे स्पष्टपणे म्हटलेले आहे. सेवेच्या इतर शर्ती, (Other conditions of service-Probation) सेवा निवृत्ती व सेवा निवृत्तीनंतरची पुनर्नेमणूक, (Superannuation and re-employment) तक्रार निवारण यंत्रणा (Grievance Redressal Mechanism) व व्यावसायिक वर्तनसंहिता (code of professional Ethics) ह्या सर्व बाबी यु.जी.सी.च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यापीठानी स्टॅट्युटव्दारे विहित करावयाच्या आहेत. **स्टॅट्युट तयार करणे हे कायद्याने सिनेटकडे सोपविलेले काम असल्यामुळे सिनेटच्या निवडणुका व त्यातील शिक्षकांचा सहभाग हा किती महत्त्वाचा आहे ही गोष्ट कोणाच्याही सहजपणे लक्षात येईल.**

**१३.** कुलगुरू हे विद्यापीठाचे प्रशासकीय प्रमुख अधिकारी म्हणून कार्य पहात असतात. विद्यापीठाच्या कायद्याने व परिनियमांनी या कामात कुलगुरुंना मदत करण्यासाठी सहाय्यक कुलसचिवापासून तर कुलसचिवापर्यंत अधिकाऱ्यांचा एक मोठा ताफा दिलेला असतो. शिवाय कायद्याने निर्माण केलेली विद्यापीठाची अनेक प्राधिकरणे आपल्या विधीमय अधिकारांचा वापर करून धोरणात्मक निर्णय घेत असतात. अनेक समित्या या कामी कार्यरत असतात. या प्राधिकरणांचे अनेक सदस्यसुद्धा (पदाधिकारी म्हणून) कुलगुरुंना त्यांच्या कामामध्ये मदत करीत असतात.

**१४.** गेल्या १० वर्षांच्या काळामध्ये नेटसेटच्या प्रश्नाने शिक्षक म्हणून नव्याने व्यवसायात आलेल्या प्राध्यापकांचा अमर्याद छळ केला असे दिसून येते.

(१) महाराष्ट्रात सेटची एकही परीक्षा आयोजित केलेली नसतांना ती परीक्षा उत्तीर्ण करण्याचा आग्रह शासनाने धरला होता. कायद्यामध्ये बदल करुन नेटसेट पात्रता परीक्षा सक्तीची केलेली नसतांना व ही पात्रता लादण्याचा प्रयत्न विद्यापीठ अनुदान आयोगाने चालविला असतांना अमरावती विद्यापीठाच्या मा. कुलगुरुंनी याबाबतची ठाम भूमिका विद्यापीठ अनुदान आयोगाला कळविली ती पुढील शब्दात :-

" Instead of firmly introducing NET/SET as a compulsory qualification at recruitment level by the competent legal instrument such as Standard Code, The State Govt. was constantly introducing NET/SET qualification by informal instruments and was simultenously enjoying the benefits of not introducing it. Since NET/SET was not inducted as a compulsory qualification at the recruitment level by legal instrument, hundreds of candidates, without NET/SET, were recruited from 1991 till the cutoff date i.e. 30.12.1999 in this university area. Advertisements were approved, selections were made, approvals were granted by the university, and because it was the perfectly lawful recruitment in the teaching cadre, 100% salary grants were paid by the State Govt. in respect of such lawfully recruited teachers year after years and continued to be so paid even today."

(२) विद्यापीठाच्या वतीने आयोगाला रोखठोक शब्दात ही भूमिका कळविण्यामध्ये अमरावती विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. एस.एन.पाटील यांनी घेतलेली भूमिका अत्यंत महत्वपूर्ण होती हे जाहीरपणे नमूद केले पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाचे व उच्च न्यायालयाचे निर्णय, विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठाशी केलेला पत्रव्यवहार व विद्यापीठ कायद्यातील तरतुदींचे विश्लेषण यावर आधारित, जुनी व्यवस्था, नवी व्यवस्था, कट ऑफ डेट,

पात्रता ठरविण्याचे विधिमय माध्यम याबाबत त्यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाला कळविलेल्या भूमिकेतील एकही मुद्दा विद्यापीठ अनुदान आयोगाला गेल्या तीन वर्षात खोडून काढता आला नाही. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने व नुटाने मा. कुलगुरू डॉ.एस.एन.पाटील यांनी घेतलेल्या या अभ्यासपूर्ण भूमिकेबद्दल त्यांना जाहीरपणे धन्यवाद दिलेले आहे.

(३) मा. कुलगुरुंच्या बरोबरीने या संकटापासून नेटसेटग्रस्त शिक्षकांचा बचाव करण्यात विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांवर गेल्या काही वर्षात काम करणाऱ्या विविध प्रतिनिधींचे निश्चितपणे आभार मानले पाहिजेत. दिनांक २८ जानेवारी २००२ रोजी झालेल्या बैठकीत अमरावती विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाने (विषय क्रमांक १२ वर) याबाबत अतिशय महत्त्वपूर्ण ठराव मंजूर केला. त्यातील महत्त्वाचा भाग पुढील प्रमाणे :-

"अधिव्याख्यात्यांच्या भरतीच्या वेळी अधिव्याख्याता पदांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता ठरविणारे विधीमय माध्यम म्हणजे

i) विद्यापीठाचे परिनियम, किंवा

ii) मा. कुलगुरुंनी निर्गमित केलेले निर्देश किंवा

iii) शासनाने निर्गमित केलेली प्रमाण संहिता.....

या विद्यापीठामध्ये दि. ३०.१२.९९ पर्यंत अधिव्याख्यात्यांच्या नियुक्तीसाठी "नेट" अथवा "सेट" परीक्षा उत्तीर्ण ही अट, अथवा अशी सक्तीची पात्रता, उपरोक्त विधीमय माध्यमात कधीही विहीत करण्यात आलेली नव्हती..... सर्वोच्च न्यायालयाने Civil Appeal No. 1819 of 1994 या प्रकरणात यासंदर्भात स्पष्ट स्वरुपाचा निवाडाही दिलेला आहे आणि ह्याच निवाड्यात ही परीक्षा पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहणार नाही असेही स्पष्ट करण्यात आलेले आहे...... विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्गमित केलेल्या ४ एप्रिल २००० च्या रेग्युलेशन मधील परंतूक या संबंधी स्पष्ट आहे, "Provided further that these regulations shall not be applicable to such cases where selections of the candidates having had the then requisite minimum qualifications as were existing at that time through duly constituted selection committee for making appoiments to the teaching posts have been made prior to the enforcement of these regulations". नेट/सेट ची अट पूर्वलक्षी प्रभावाने लागू होऊ शकणारी नाही हे यातून स्पष्ट करण्यात आलेले आहे......वरील सर्व बाबींचा विचार करता अमरावती विद्यापीठ व्यवस्थापन परिषद महाराष्ट्र शासनाला अशी विनंती करते की, शासन निर्णय क्रं. एनजीसी-१२०१/११८१५/(३८/०१)/वि.शि.-४, दि. १८ ऑक्टोबर २००१ मधील परिच्छेद क्रं. २ अ, ब, क इ तातडीने रद्द करण्यात यावेत".

(४) निर्वाचित प्रतिनिधींनी केवढ्या जागरुकपणे व अभ्यासपूर्ण रीतीने काम केले पाहिजे याचा हा ठराव म्हणजे एक उत्तम नमुना आहे असे म्हणता येईल. त्यातील एकही मुद्दा शासनाला किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाला आजपावेतो खोडून काढता आला नाही.

(५) सन १९९१ पासूनच्या नेटसेट नसलेल्या सर्व शिक्षकांची प्रकरणे विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविण्याचा आग्रह शासन व आयोग धरत असतांना कट ऑफ डेट (३०.१२.१९९९) पूर्वीचे एकही प्रकरण पाठविणे हे सर्वोच्च न्यायालयाचा अवमान करणारे आहे अशी ठाम भूमिका अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने घेतली. आज पावेतो ३०.१२.१९९९ पूर्वीचे एकही प्रकरण न पाठविणारे अमरावती विद्यापीठ हे महाराष्ट्रातील एकमेव विद्यापीठ आहे. ही वस्तुस्थिती म्हणजे निर्वाचित प्रतिनिधींनी केलेल्या अभ्यासपूर्ण कामगिरीचे एक प्रमाणपत्रच होय.

(६) एखाद्या तारखेला एखादा ठराव करणे ही एक गोष्ट आहे. पण कायद्यावर व अभ्यासावर आधारित भूमिका घेणे व सतत अनेक वर्षे त्या भूमिकेचा चिकाटीने पाठपुरावा करणे ही वेगळी गोष्ट आहे. अमरावती विद्यापीठाच्या मा. कुलसचिवांनी राज्य शासनाला १० जानेवारी २००५ रोजी पाठविलेल्या एका पत्रामध्ये व्यवस्थापन परिषदेने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयाची विपुल माहिती देण्यात आलेली आहे. त्यातील महत्त्वाचा मजकूर पुढील प्रमाणे :-

"उपरोक्त पत्रांची नोंद घेत असताना, खालील बाबी शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात असे व्यवस्थापन परिषदेने निर्देश दिलेत:-

"शासनाच्या उपरोक्त पत्रांमध्ये दिनांक १९.९.१९९१ नंतर अधिव्याख्याता म्हणून सेवेत रूजू झालेल्या बिगर नेट/सेट अर्हताधारक अधिव्याख्यात्यांचा नेट/सेट अर्हतेत सुट मिळण्याबाबतचे प्रस्ताव विद्यापीठाद्वारे पाठविण्याबाबत स्पष्ट उल्लेख नाही. तथापि, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) यांच्या दि.२८.१०.२००४ च्या पत्रात उल्लेख आहे. परंतु त्याच पत्राचा संदर्भ देऊन नंतर शिक्षण संचालकाकडून प्राप्त झालेल्या दि.१.११.२००४ च्या पत्रामध्ये मात्र सदर तारखेचा उल्लेख करण्यात आलेला नाही असे व्यवस्थापन परिषदेच्या निदर्शनास आले आहे...... अनुदान आयोगाच्या कुठल्याही पत्रव्यवहारात सरसकट १९.९.१९९१ पासून नियुक्त झालेल्या बिगर नेट / सेट अधिव्याख्यात्यांचे नेट/सेट अर्हतेत सुट मिळण्याबाबतचे प्रस्ताव अनुदान आयोगाला पाठविण्यात यावे असा स्पष्ट उल्लेख आढळून येत नाही असे शासनाला कळविण्यात यावे".

(७) अमरावती विद्यापीठाच्या प्राधिकरणांनी घेतलेल्या या संपूर्णपणे कायदेशीर भूमिकेमुळे विद्यापीठ अनुदान आयोग हादरले असून त्यांनी आता त्या मुद्यांवर विधितज्ञांचा सल्ला घ्यायला सुरुवात केली आहे. दिनांक २२ सप्टेंबर २००५ रोजी राज्य शासनाने सर्व विद्यापीठांना एक पत्र पाठविले असून त्या पत्रासोबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहसचिवांनी राज्याच्या उच्च शिक्षण सचिवांना २७ जुलै २००५ रोजी पाठविलेले एक पत्र (D.No.F.1-1/2005(PS) जोडलेले आहे या पत्रात त्यांनी असे नमूद केले आहे की.

"During the deliberation in the Exemption Committee meeting, a question arose, as to how to deal with the cases wherever during the interregnum period between i.e. 27.7.1998 .... and 4.4.2000 ... whereby the Govt. of Maharashtra constituted Selection Committees for appointment to the post of Lecturer not in conformity with UGC Regulations of 4.4.2000. It was decided that the office of the UGC may take legal opinion from UGC's Legal Consultant as to how to treat them at the present juncture (By the Exemption Committee). "

(८) याच पत्रामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने असेही नमूद केले आहे की, :-

"The teachers, who were appointed based on the Selection Committee Constitution as per norms of the Maharashtra State Govt. (issued vide their Statutes/ Ordinances/Notification dated 11th December, 1999, 21st January, 2000 and 23rd May, 2000) Effectively speaking all those cases who were appointed in between UGC Notification dated 27.7.1998 and UGC Regulations dated 4.4.2000 respectively are included in this. **It was felt desirable that such cases for the time being be deferred and legal advice be obtained on this specific issue. The Commission is separately taking legal opinion on this issue.**"

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या डोक्यात हा जो हळुहळू व थोडा थोडा प्रकाश पडायला लागला आहे याचे फार मोठे श्रेय अमरावती विद्यापीठाच्या प्राधिकारीणीचे सदस्य व निवृत्तमान कुलगुरू डॉ.एस.एन.पाटील यांना आहे. महाराष्ट्रात तर सोडाच पण भारतात सुद्धा ज्या विषयामध्ये 'नेटसेट'ची परीक्षा एकदाही झालेली नव्हती तेव्हा काही शिक्षकांना "नेटसेटची परीक्षा उत्तीर्ण केली नाही या कारणावरून तुम्हाला सेवामुक्त करण्यात येत आहेत" असे आदेश अमरावती विद्यापीठाच्या तिसऱ्या कुलगुरुंनी त्यावेळी काढले होते या गोष्टीचे सुद्धा या निमित्ताने स्मरण झाल्याशिवाय रहात नाही.

(९) जागरूकपणे काम करणारा निर्वाचित प्रतिनिधी ही बाजारात उपलब्ध असलेली, खरेदी करता येण्यासारखी वस्तू नसून मतदानाच्या संधीचा उत्तम वापर करणाऱ्या जनसमुहाने त्या संधीच्या माध्यमातून मिळविलेली नियतकालिक उपलब्धी असते. उत्तमरितीने काम करण्याची इच्छा असलेल्या उमेदवारांची एक यादी पदवीधर व शिक्षक मतदार संघातील उमेदवारांच्या निमित्ताने मतदारांच्या समोर आहे.

**१५.** सिनेटमध्ये निवडून गेलेल्या व तेथून व्यवस्थापन परिषदेवर गेलेल्या प्रतिनिधींनी आपल्या १० - १५ वर्षांच्या कार्यकाळात कर्तव्यदक्ष राहून अनेक घातक प्रस्ताव फेटाळून लावले व अतिशय महत्वपूर्ण असे विधायक निर्णय सिनेटमध्ये व व्यवस्थापन परिषदेमध्ये घेतलेत त्यामुळे शिक्षक व विद्यार्थी जगताला न्याय मिळवून देणारे अनेक निर्णय कार्यान्वित झाले. या कार्यकाळातील काही महत्वपूर्ण निर्णय पुढील प्रमाणे :-

(१) नेटसेट ची पात्रता कायदेमान्य नसतांना विधीमय पात्रता धारण करणाऱ्या व विधीवतरित्या नियुक्त झालेल्या अधिव्याख्यात्यांना केवळ एका

वर्षाची मान्यता देण्याची वहिवाट पडलेली होती. सदर बाब ही नियमबाह्य असल्यामुळे **सत्रांत पद्धतीने मान्यता देणे बंद करून कायम स्वरुपी मान्यता देण्याचा निर्णय** घेतल्यामुळे शेकडो अधिव्याख्यात्यांची अडून राहिलेली प्रकरणे निकालात निघाली व शिक्षकांना न्याय मिळाला.

(२) परीक्षा विभागात **स्वतंत्र प्रबंध शाखा** उघडण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेपासून विविध विद्याशाखातून संशोधनाचे कार्य होत आहे. आचार्य पदवीसाठी संशोधनाचे महत्त्व लक्षात घेवून प्रतिनिधींची एक समिती निर्माण करून तिच्या शिफारसी मान्य करण्यात आल्या व परीक्षा विभागात स्वतंत्र प्रबंध शाखा निर्माण करण्यात आल्याने प्रबंधाच्या संदर्भातील संशोधक विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर झाल्यात व त्यांना न्याय मिळाला.

(३) विद्यापीठाच्या विविध मुद्रण कामांच्या संदर्भात **मुद्रणपूर्ण व्यवस्थेचे आधुनिकीकरण व संगणकीकरण** करण्यात आले. विद्यापीठातील अभ्यासक्रमिकांची जुळवणी विद्यापीठ संगणकावर घेवून नियोजित पद्धतीने मुद्रणपूर्व कामे करून घेण्याचा निर्णय घेतल्याने मुद्रणावरील खर्चात बरीच काटकसर होवू शकली. एवढेच नव्हे तर त्यामुळे अभ्यास क्रमिका विद्यार्थ्यांना वेळेवर उपलब्ध होऊ लागल्या.

(४) विद्यापीठ परिसरामध्ये साठवण **जलाशय व पाणीपुरवठ्याची बृहत योजना** तयार करून कार्यान्वित करण्यात आली.

(५) विद्यापीठातील संलग्नित महाविद्यालयातील **प्राचार्यांच्या नेमणुका** नियमित नव्हत्या. बहुतांशी महाविद्यालयातील नेमणुका नियमित करण्याच्या दृष्टीने नियमित नियुक्त्या करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

(६) शिक्षण महर्षि डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने एक समिती नेमण्यात आली. सदर समितीने सादर केलेल्या मुळ प्रस्तावात दुरुस्ती सूचवून शिक्षण महर्षि डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुखांच्या "The Origin and development of Religion in vedic literature' या **मूळ प्रबंधाच्या प्रति** काढून अभ्यासकांना उपलब्ध करून देण्यात आल्या.

(७) उजळणी वर्गामध्ये भाग घेण्याची संधी अधिव्याख्यात्यांना उपलब्ध झालेली नसल्यास अशा शिक्षकांच्या पदोन्नती रोखण्याच्या कार्यवाहीच्या विरोधात पुढील महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. "उजळणी वर्गामध्ये भाग घेण्याची संधी उपलब्ध असूनही अधिव्याख्यात्यांनी जाणीवपूर्वक भाग घेतला नाही अशी प्रकरणे सोडून उरलेल्या सर्व प्रकरणात पदोन्नती देण्यात यावी."

(८) निवड समितीने विधीवतरित्या ज्यांची निवड केलेली आहे अशा **अधिव्याख्यात्यांच्या निवडीला मान्यता मागणाऱ्या प्रस्तावावर एक महिन्याच्या आत निर्णय घेतला पाहिजे** असा दंडक घालून दिला. सदर शिक्षकास मान्यतेच्या पत्राची प्रत पाठवावी.

(९) विद्यापीठातील आर्थिक गैरव्यवहाराला पायबंद घालण्याकरिता शिस्त लावण्याचा प्रयत्न करण्यात आला. **विद्यापीठामध्ये येणारे संपूर्ण शुल्क एकाच ठिकाणी घेण्यात यावे व त्याची संगणकीकृत पावती संबंधीतांना देण्यात यावी ह्या संबंधीचा निर्णय घेण्यात आला.** विद्यापीठामार्फत होणारे सर्व शोधन संगणकीकृत धनादेशाद्वारेच करण्यात यावे असाही निर्णय घेण्यात आला.

(१०) विद्यापीठाच्या **संपूर्ण कामकाजाचे संगणकीकरण** करण्याचा निर्णय घेण्यात आला.

(११) विद्यापीठाच्या सर्व परीक्षांचे निकाल हे वेबसाईट द्वारे विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आले.

(१२) परीक्षेतील **गैरव्यवहार प्रकरणे संगणकीय पद्धतीने हाताळण्याची व्यवस्था** स्थापित करण्यात आली. अशा प्रत्येक विद्यार्थ्याला त्याची 'चूक' रजिस्टर्ड पोस्टाने कळवून त्यावर अपिल करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आली. संगणकीय व्यवस्थेमुळे अशा प्रकरणात होणारा आपपरभाव पूर्णपणे संपुष्टात आला.

(१३) परीक्षेतील गैरव्यवहार हाताळणीच्या प्रकरणात वर्गीकरण करणाऱ्या शिक्षकांच्या कामाची संगणकीय पद्धतीने प्रतवारी लावण्याचा निर्णय झाला. अशा काम करणाऱ्या एकूण शिक्षकांपैकी कमी दर्जाची कामाची प्रतवारी असलेल्या **शेवटच्या एकतृतियांश शिक्षकांना या कामातून वगळण्यात यावे,** त्यांना ते काम पुन्हा देऊ नये असाही स्थायी निर्णय झाला व गेले अनेक वर्षे त्यांची उत्तमरितीने व निरपवादपणे अम्मलबजावणी सुरु आहे.

(१४) महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमध्ये अस्तिवात असलेली पुनर्मूल्यांकनाची व्यवस्था मा.कुलपती यांनी बंद केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या समोर निर्माण झालेली समस्या लक्षात घेऊन विद्यापीठाने विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती देण्याची पद्धत सुरू केली. तसेच याबाबत आलेल्या तक्रारीचे निवारण करण्याकरिता एक आदर्श तक्रार निवारण पद्धती अस्तित्वात आणली.

(१५) विद्यापीठामध्ये गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या मागासवर्ग कक्षाची गरज लक्षात घेऊन प्राधिकारीणीने सर्व लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन अमरावती विद्यापीठामध्ये शासनाच्या वर्ष २००३-२००४ पासून मागासवर्ग कक्षाची स्थापना करण्याचे संदर्भात शासन मान्यता मिळविली व त्याकरिता आवश्यक पदे सुद्धा उपलब्ध करून घेण्यात आली व विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील पाचही जिल्ह्याकरिता विद्यापीठामध्ये मागासवर्ग कक्ष कार्यान्वित करण्यात आला.

(१६) विद्यापीठाच्या परिसरामध्ये अत्याधुनिक सोयी असलेल्या दृकश्राव्य सभागृहाची निर्मिती करण्यात आली, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक परिषदा, कार्यशाळा तसेच चर्चासत्रे आयोजित करण्याकरिता मोठी सोय उपलब्ध झाली. सदर व्यवस्था संलग्नित महाविद्यालयांना सुद्धा उपलब्ध करून देण्यासंबंधिचा निर्णय घेण्यात आला.

(१७) विद्यापीठ परिसरातील भूगर्भामधील कमी होणारी पाण्याची पातळी वाढविण्यासाठी तसेच परिसरातील इमारतींच्या छतावर पडणारे पाणी वाया जावू न देता सरळ विहीर व बोअरवेल मध्ये फिल्टर करून सोडण्यासाठी एकूण १४ इमारतींवर वाटर हार्वेस्टींग सिस्टिम स्थापन करून जलसंधारणाच्या क्षेत्रातील उपयुक्त अशी कामगिरी विद्यापीठ प्राधिकारीणीने पार पाडली.

**१६.** विद्यार्थ्यांचे हित हा सबंध विद्यापीठाच्या कामाचा केंद्रबिंदू असला पाहिजे. ही केवळ शाब्दिक पोपटपंची असता कामा नये. "आधी केले मग सांगितले" असे या शब्दांचे स्वरूप असले पाहिजे. १९९४ च्या विद्यापीठ कायद्याच्या आठव्या प्रकरणामध्ये विद्यार्थी हिताच्या अनेक तरतुदी आल्या आहेत. प्रवेश गुणवत्तेवर व नियमानुसार झाले पाहिजेत, प्रवेश नियमाला सोडून झाल्यास चटकन न्याय मिळण्यासाठी न्यायाधिकरणाची तरतूद, विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे संपूर्ण वेळापत्रक त्याला ३० ऑक्टोबरपूर्वी दिले पाहिजे, ठरवून दिलेल्या वेळी निकाल जाहीर केले पाहिजे या व अशा सारख्या तरतुदी महाराष्ट्रातील कोणत्याही विद्यापीठ कायद्यामध्ये यापूर्वी कधीही समाविष्ट नव्हत्या. १९९२ च्या मूळ विधेयकामध्ये (सन १९९२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८) सुद्धा या तरतुदी नव्हत्या. उभय सभागृहाच्या संयुक्त समितीने हे आठवे प्रकरण पूर्णपणे नव्याने या कायद्यात समाविष्ट केले. या समितीचा एक सदस्य या नात्याने माझ्या या कामातील सहभागाबद्दल मला नेहमीच आनंद वाटला आहे. या समितीची कार्यवृत्ते पाहिल्यास माझ्या या कामातील प्रभावी सहभागाचा परिचय सहज होवू शकेल.

**१७.** शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या व्यावसायिक जीवनाला चाटून जाणाऱ्या अनेक तरतुदी १९९४ च्या कायद्याच्या सातव्या प्रकरणामध्ये समाविष्ट आहेत. याबाबत समितीचा सदस्य या नात्याने मी उपसलेली मेहनत सर्वच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ठाऊक आहे. त्याची पुनरावृत्ती करीत नाही.

**१८.** केवळ कायद्यात चांगल्या तरतुदी असून भागत नाही तर त्याची उत्तम अंमलबजावणी होण्यासाठी विविध प्राधिकरणावर उत्तम व्यक्ती निवडून जाणे आवश्यक असते. लोकशाही व्यवस्थेमध्ये त्या त्या संस्थांमध्ये काम करणाऱ्या माणसांच्या दर्जावर त्या संस्थांचे भवितव्य अवलंबून असते. उत्तम दर्जाची माणसे विद्यापीठामध्ये विविध पदावर निवडून आली तर त्या माणसांची व त्याबरोबरच त्या पदांची शान वाढते. कमी दर्जाची माणसे निवडून आली तर त्या प्रमाणात त्या त्या पदांचे अवमूल्यन होते. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या व्यावसायिक सेवाशर्तीबाबत काम करीत असतांना विद्यापीठाच्या या एकंदर व्यवस्थेमध्ये विद्यार्थी हा खरा केंद्रबिंदू राहील ही पॅनेल सदस्यांची सिनेटमध्ये काम करतांनाची श्रद्धा असेल.

**१९.** जात, धर्म किंवा राजकीय पक्ष, विद्यापीठातील गटबाजी यांचा विचार व पर्वा न करता शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या हितसंबंधाची जपणूक करणे ही भूमिका असेल.

**२०.** विद्यापीठाचा कारभार चालत असतांना तो व्यक्तीच्या लहरीनुसार न चालता विधिनियम, परिनियम, अध्यादेश, विनियम, नियम यांच्या आधारेच चालला पाहिजे यावर काटेकोरपणे लक्ष ठेवले जाईल.

**२१.** १९९४ च्या विद्यापीठ कायद्यातील तरतूदीनुसार निरनिराळ्या क्षेत्रातील पदवीधरांचे व शिक्षकांचे जे प्रतिनिधी सिनेटमध्ये पाठवावयाचे आहेत, त्या जागांसाठी आमच्या कांही सहकारी मित्रांचे "शिक्षक व पदवीधर पॅनेल" आपणासमोर आहे. **त्यापैकी आपणास पसंत असलेल्या उमेदवाराला आपण क्रमांक १ द्यावा व पॅनेलमधील इतर सर्व उमेदवारांना पसंतीचे पुढचे क्रमांक द्यावेत. अशी विनंती आहे.**

- ***बी.टी.देशमुख***

*****

# TEACHERS' PANEL

*(All the names of the candidates are shown in the alphabetical order as are arranged in the University list.)*

**मतदान करण्याबाबत आमची विनंती**

**1) Faculty of Arts : General Category : Two Seats**

Alone D.V.
Deshmukh Vivek Shridhar
Ingle Nilkanth Pralhadrao
Jadhao Subhash Hiraman
Morey S.N.
Quazi Muniruddin Alimuddin

**पसंतीक्रम :** मतदारांनी या सहा उमेदवारांपैकी पसंत असलेल्या उमेदवाराला १ क्रमांक द्यावा व त्यानंतर आपल्या पसंतीप्रमाणे इतर उमेदवारांना २, ३, ४, ५, ६ असे पसंतीचे क्रमांक द्यावेत.

**2) Faculty of Arts : Woman Category : One Seat**

Rathi Beena Vinod

**पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

**3) Faculty of Science : General Category : Two Seats**

Aswale S.R.
Chaudhari Shashikant V.
Deshmukh V.R.
Jadhao C.M.
Katore Shivdas Deoman

**पसंतीक्रम :** मतदारांनी या पाच उमेदवारांपैकी पसंत असलेल्या उमेदवाराला १ क्रमांक द्यावा व त्यानंतर आपल्या पसंतीप्रमाणे इतर उमेदवारांना २, ३, ४, ५, असे पसंतीचे क्रमांक द्यावेत.

**4) Faculty of Science : Woman Category : One Seat**

Deshmukh Mrs.Sanyogita S.

**पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

**5) Faculty of Education : General Category : One seat**

Deshmukh M. T.

**पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

**6) Faculty of Education : OBC Category : One seat**

Gawande Devendra R.
Tone Vikas Rameshwarrao

**पसंतीक्रम :** मतदारांनी या दोन उमेदवारांपैकी पसंत असलेल्या उमेदवाराला १ क्रमांक द्यावा व त्यानंतर आपल्या पसंतीप्रमाणे दुसऱ्या उमेदवाराला २ असा पसंतीचा क्रमांक द्यावा.

**7) Faculty of Engg and Tech : General Category : One seat**

Deshmukh H.R.
Ingole D.T.
Ingole Jayant Gajananrao
Kubde R. A.

**पसंतीक्रम :** मतदारांनी या चार उमेदवारांपैकी पसंत असलेल्या उमेदवाराला १ क्रमांक द्यावा व त्यानंतर आपल्या पसंतीप्रमाणे इतर उमेदवारांना २, ३, ४ असे पसंतीचे क्रमांक द्यावेत.

**8) Faculty of Commerce : General Category : Two Seats**

Deshmukh Sunil Narayanrao
Dube Ajay Jagatnarayan
Gawande B.T.
Jadhao Subhash Pandurang
Jayle V.N.
Tidke V.R.

**पसंतीक्रम :** मतदारांनी या सहा उमेदवारांपैकी पसंत असलेल्या उमेदवाराला १ क्रमांक द्यावा व त्यानंतर आपल्या पसंतीप्रमाणे इतर उमेदवारांना २, ३, ४, ५, ६ असे पसंतीचे क्रमांक द्यावेत.

**9) Faculty of Social Sciences : General Category : Three Seats**

Avhale Bharat Pandurang
Dhale B.L.
Gawai S.S.
Gudadhe D.G.
Patankar Laxman Sampatrao
Rathod Krushna Bakshi
Yawale Dnyaneshwar Ramrao

**पसंतीक्रम :** मतदारांनी या सात उमेदवारांपैकी पसंत असलेल्या उमेदवाराला १ क्रमांक द्यावा व त्यानंतर आपल्या पसंतीप्रमाणे इतर उमेदवारांना २, ३, ४, ५, ६, ७ असे पसंतीचे पुढचे क्रमांक द्यावेत.

**10) Faculty of Social Sciences : Woman Category : One Seat**

Chore Ku. V.D.

**पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

**11) Faculty of Medicine : General Category : One Seat**

Dudhane M.N.

**पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

**12) Faculty of Home Sciences : General Category : One Seat**

Vidhalae Chhaya Narendra

**पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

## TEACHERS' PANEL

*1) Faculty of Arts : General Category*

Alone D.V.
Deshmukh Vivek Shridhar
Ingle Nilkanth Pralhadrao
Jadhao Subhash Hiraman
Morey S.N.
Quazi Muniruddin Alimuddin

*2) Faculty of Arts : Woman Category*

Rathi Beena Vinod

*3) Faculty of Science : General Category*

Aswale S.R.
Chaudhari Shashikant V.
Deshmukh V.R.
Jadhao C.M.
Katore Shivdas Deoman

*4) Faculty of Science : Woman Category*

Deshmukh Mrs.Sanyogita Shrikant

*5) Faculty of Education : General Cate.*

Deshmukh M. T.

*6) Faculty of Education : OBC Category*

Gawande Devendra R.
Tone Vikas Rameshwarrao

*7) Engg. and Tech. : General Category*

Deshmukh H.R.
Ingole D.T.
Ingole Jayant Gajananrao
Kubde R. A.

*8) Faculty of Commerce : General Cate.*

Deshmukh Sunil Narayanrao
Dube Ajay Jagatnarayan
Gawande B.T.
Jadhao Subhash Pandurang
Jayle V.N.
Tidke V.R.

*9) Faculty of Social Sciences : General Cate.*

Avhale Bharat Pandurang
Dhale B.L.
Gawai S.S.
Gudadhe D.G.
Patankar Laxman Sampatrao
Rathod Krushna Bakshi
Yawale Dnyaneshwar Ramrao

*10) Faculty of Social Sciences : Woman Cate.*

Chore Ku. V.D.

*11) Faculty of Medicine : General Cate.*

Dudhane M.N.

*12) Faculty of Home Sciences : General Cate.*

Vidhalae Chhaya Narendra

***सूचना :*** *(१) वरील टीचर्स व ग्रॅज्युएट पॅनेलच्या यादीतील सर्व उमेदवारांना पसंतीक्रम द्यावे ही विनंती. कोणाला कोणता क्रम द्यावा यासंबंधी मतदाराने घरीच निर्णय घेऊन तसे क्रम वरील उजव्या बाजूच्या यादीवर लिहून घ्यावे. म्हणजे मतदानास वेळ लागणार नाही. (२) आधीच पसंतीक्रम लिहून या पृष्ठावरील उजव्या बाजूची उमेदवारांची यादी मतदान कक्षात नेता येईल. (३) पसंतीक्रम आधीच लिहून नेल्यास प्रत्यक्ष मतदान करणे सोईचे होईल व वेळेची सुध्दा बचत होईल.*

# GRADUATES' PANEL

FIVE GENERAL/OPEN

**मतदान करण्याबाबत आमची विनंती**

Deshmukh Uday Trimbakrao
Domle Somprakash Shriram
Gawande Chandrakant Gulabrao
Kadu Surendra Tryambakrao
Kolhe Sanjay Shrikrishna
Metkar Vidyadhar Madhukarrao
Patil Rajendra Anantrao
Shirbhate Kishor Vishnupant
Somwanshi Ashok Narayanrao
Tare Shripad Krishnarao
Thokal Vijay Panjabrao

**पसंतीक्रम :** मतदारांनी या उमेदवारांपैकी पसंत असलेल्या उमेदवाराला १ क्रमांक द्यावा व त्यानंतर आपल्या पसंतीप्रमाणे इतर सर्व उमेदवारांना पसंतीचे पुढचे क्रमांक द्यावेत.

# RESERVED SEATS

**Woman Category : One Member**

Deshmukh Ku. Veena L.

**पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

**Scheduled Caste : One Member**

Nimbolkar Sanjay Namdeo

**पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

**Scheduled Tribes : One Member**

Warkhede Keshao Sakharamji

**पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

**VJNT Category : One Member**

Dhore Prakash Shriram

**पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

**Other Backward Caste : One Member**

Borde Pramod Deolal
Daware Prashant Ramdaspant

**पसंतीक्रम :** मतदारांनी या दोन उमेदवारांपैकी पसंत असलेल्या उमेदवाराला १ क्रमांक द्यावा व त्यानंतर आपल्या पसंतीप्रमाणे उरलेल्या उमेदवाराला २ असा पसंतीचा क्रमांक द्यावा.

## GRADUATES' PANEL

*Five General/Open*

Deshmukh Uday Trimbakrao
Domle Somprakash Shriram
Gawande Chandrakant Gulabrao
Kadu Surendra Tryambakrao
Kolhe Sanjay Shrikrishna
Metkar Vidyadhar Madhukarrao
Patil Rajendra Anantrao
Shirbhate Kishor Vishnupant
Somwanshi Ashok Narayanrao
Tare Shripad Krishnarao
Thokal Vijay Panjabrao

## RESERVED SEATS

*Woman Category : One Member*

Deshmukh Ku. Veena L.

*Scheduled Caste : One Member*

Nimbolkar Sanjay Namdeo

*Scheduled Tribes : One Member*

Warkhede Keshao Sakharamji

*VJNT Category : One Member*

Dhore Prakash Shriram

*Other Backward Caste : One Member*

Borde Pramod Deolal
Daware Prashant Ramdaspant

***सूचना :*** *(१) वरील टीचर्स व ग्रॅज्युएट पॅनेलच्या यादीतील सर्व उमेदवारांना पसंतीक्रम द्यावे ही विनंती. कोणाला कोणता क्रम द्यावा यासंबंधी मतदाराने घरीच निर्णय घेऊन तसे क्रम वरील उजव्या बाजूच्या यादीवर लिहून घ्यावे. म्हणजे मतदानास वेळ लागणार नाही. (२) आधीच पसंतीक्रम लिहून या पृष्ठावरील उजव्या बाजूची उमेदवारांची यादी मतदान कक्षात नेता येईल. (३) पसंतीक्रम आधीच लिहून नेल्यास प्रत्यक्ष मतदान करणे सोईचे होईल व वेळेची सुध्दा बचत होईल.*

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Prof. A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.R. Kalmegh, Lahari Apartment, Keshao Colony, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/ 2001/4448 Licenced to post without prepayment **LICENCE NO.** NR/ATI/78/2002 Name of the Posting office : **R.M.S. Amravati.**
Date of Posting : **15.10.2005**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

---

To,.........................................................................
.............................................................................
.............................................................................
.............................................................................
.............................................................................